# "उन्नत शेती समृध्द शेतकरी मोहिम"
# शेतकरी प्रशिक्षण व शेतकरी सहल सविस्तर सूचना २०१७-१८

शासनाने शासन निर्णय क्र. ०३१७/प्र.क्र.१८/राकृवियो कक्ष, दि. १३ एप्रिल, २०१७ अन्वये, राज्यात "उन्नत शेती व समृद्ध शेतकरी मोहीम" राबविण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये शेतकरी प्रशिक्षण व शेतकरी सहल ही बाब या मोहीमेचाच भाग म्हणून राबवायची आहे. सर्व केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांमध्ये मोठ्या प्रमाणावर शेतकरी प्रशिक्षण व सहलीचे आयोजन केले जाते. या वर्षी या मोहीमेंतर्गत सर्व प्रशिक्षण व सहलींचे आयोजन प्रकल्प संचालक, आत्मा यांनी करावयाचे आहे. प्रशिक्षण व सहलींसाठी शेतक-यांची निवड करताना प्रात्यक्षिकांतर्गत निवडलेल्या शेतक-यांना प्राधान्य द्यावयाचे असल्याने जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व प्रकल्प संचालक आत्मा यांनी समन्वयाने कार्यक्रम राबविणे अपेक्षित आहे. याकरिता खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

१) केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, राष्ट्रीय गळीतधान्य व तेलताड अभियान, कृषि यांत्रिकीकरण उप अभियान, राष्ट्रीय कृषि विकास योजना, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान व राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्तार विषयक सुधारणांकरिता सहाय्य (आत्मा) योजना अंतर्गत घ्यावयाचे प्रशिक्षणांचा एकत्रित आराखडा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, प्रकल्प संचालक आत्मा यांनी कृषि विद्यापीठ, कृषि विदयापीठांतर्गत संशोधन केंद्र, शासकीय कृषि महाविद्यालय, केंद्र शासनाच्या संस्था, कृषि विज्ञान केंद्र इ. संस्थांकडे उपलब्ध असलेल्या शास्त्रज्ञांचा विचार करुन त्यांच्या मदतीने तयार करावा.

२) आत्मा व इतर योजनांचे प्रशिक्षण व सहलींचे एकत्रित नियोजन करुन घेण्यात यावे. प्रकल्प संचालक आत्मा व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी एकत्रित आराखडा त्वरीत चार दिवसांत तयार करुन विभागीय कृषि सह संचालक यांची मान्यता घ्यावी व एक प्रत संचालक, आत्मा व कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांना द्यावी.

३) सन २०१७-१८ पासुन सर्व केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांमध्ये शेतकरी प्रशिक्षणाचा कार्यक्रम प्राधान्याने कृषि विद्यापीठ, कृषि विदयापीठांतर्गत संशोधन केंद्र, केंद्र शासनाच्या संस्था, कृषि विज्ञान केंद्र, शासकीय कृषि महाविद्यालय इ. शासकीय संस्थांमध्ये आयोजित करावा. व या संस्थांकडे प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध झाली नाही तरच कृषि चिकित्सालयाच्या प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे.

४) एका वेळेस कमाल १०० शेतक-यांची बॅच तयार करुन प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन करावे.

५) प्रशिक्षणासाठी प्रात्यक्षिकांतर्गत निवड केलेल्या शेतक-यांची प्राधान्याने निवड करुन त्यांना प्रशिक्षणाकरिता आणण्याची जबाबदारी कृषि सहाय्यक निहाय निश्चित करावी.

६) शेतक-यांना द्यावयाचे प्रशिक्षण साहित्य संबंधित प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांनी तयार करावे.

७) वाहतुकी करिता आवश्यक असणारे अनुदान हे थेट कृषि सहाय्यकांना देण्यात यावे.

८) प्रत्येक तालुक्याचे प्रशिक्षणाच्या ठिकाणाचे अंतर विचारात घेऊन तालुकानिहाय प्रशिक्षणार्थींना लागणारा प्रवासाचा खर्च निश्चित करावा. शक्यतो प्रवासाचा खर्च कमीतकमी येईल असे नियोजन करावे. वाहतुकीचा खर्च वगळता प्रशिक्षणाची उर्वरीत रक्कम संबंधीत प्रशिक्षण संस्थेस इलेक्ट्रॉनिक पद्धतीने/धनादेश/धनाकर्षाव्दारे वर्ग करण्यात यावी.

९) सर्व योजनेतील शेतकरी सहलींमध्ये विविध संस्था, कृषि विद्यापीठ प्रक्षेत्र या सोबतच योजनांतर्गत प्रात्यक्षिके व त्या पिकात अधिकतम उत्पादकता घेतलेल्या शेतक-यांच्या क्षेत्रातच सहलीचे नियोजन करावे.

१०) एखाद्या कृषि पुरक व्यवसायाकरिता सहलीचे आयोजन करावयाचे असल्यास त्या व्यवसायातील यशस्वी शेतक-यांकडे सहलीचे आयोजन करावे.

११) सहलीचे वेळापत्रक ठरवून आत्मा नियामक मंडळाच्या मान्यतेने विभागीय कृषि सह संचालक यांच्या मान्यतेसाठी सादर करावे व विभागीय कृषि सह संचालक यांचे पूर्ण परवानगीने सहलीचे आयोजन करावे.

१२) केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे महिला/ अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीतील लाभार्थांना ठरवून दिलेल्या प्रमाणात खर्च करावा.

१३) विविध योजनांतर्गत उपलब्ध निधीचे वरीलप्रमाणे नियोजन करतांना संबंधित योजनेच्या मार्गदर्शक सूचना व मापदंडाप्रमाणेच खर्च करणे आवश्यक आहे.

**संचालक,आत्मा**
कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे

----------------

जा.क्रं/संचालक आत्मा/प्रशिक्षण व सहल/मासु/११०/२०१७
कृषि आयुक्तालय , महाराष्ट्र राज्य,
पुणे -४११००५. दिनांक –२५/०४/२०१७

**प्रति,**

१) मा. प्रधान सचिव (कृषि व फलोत्पादन), मंत्रालय, मुंबई-४११ ०३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा. संचालक, विस्तार शिक्षण, --------------------कृषि विद्यापीठ (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव सादर.
३) कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषि आयुक्तालय , म.रा. पुणे-५ यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव समादराने अग्रेषित.
४) कृषि संचालक (फलोत्पादन) कृषि आयुक्तालय , म.रा. पुणे यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव समादराने अग्रेषित.
५) कृषि संचालक (निवगुनि) कृषि आयुक्तालय , म.रा. पुणे यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव समादराने अग्रेषित
६) विभागीय कृषि सह संचालक (सर्व) ---------------- यांना माहिती व योग्य त्या कार्दवाहीसाठी.
७) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)---------------- यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.
८) प्रकल्प संचालक, आत्मा (सर्व) ----------------यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.
९) कृषि उपसंचालक, मा. आयुक्त कृषी कक्ष, कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे यांना माहितीसाठी अग्रेषित.

**संचालक,आत्मा**
कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे